# स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्याचे विहंगमावलोकन

**सोमनाथ कोमरपंत**

यंदा आपल्या भारताच्या स्वातंत्र्याचे सुवर्णमहोत्सवी संवत्सर. विसाव्या शतकाच्या अंतिम टप्प्यात आपल्या स्वातंत्र्याचे अर्धशतक पूर्ण होत आहे. विसावे शतक हे सर्वार्थाने वादळी शतक होते. आपल्या राष्ट्रात राजकीय, सामाजिक, आर्थिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिकक्षेत्रात या कालखंडात आमूलाग्र बदल झालेच; शिवाय आंतरराष्ट्रीय जगतातही अनेक घडामोडी समांतरपणे झाल्या. नव्या विचारप्रणालींचा उदय झाला. या मंथनप्रक्रियेचा परिणाम आपल्यावरही झाला. या शतकाच्या मध्यावधीच्या सुमारास ब्रिटिशांच्या अधिसत्तेखाली प्रदीर्घ काळ असलेला आपला देश स्वतंत्र झाला. १९५० पासून लोकशाही विचारप्रणाली स्वीकारलेले राष्ट्र या नात्याने आपल्या भारताने नेत्रदीपक प्रगती साधलेली आहे. समृद्ध सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या भारतासारख्या खंडप्राय देशाचा विचार करता हा कालखंड छोटा आहे. पण आसेतु हिमाचल विराट राष्ट्राने एकात्म भावनेने आणि अभंग निष्ठेने या अल्पावधीत जीवनाच्या अनेक क्षेत्रांत जी वाटचाल केली ती लक्षणीय मानावी लागेल. स्वतंत्र राष्ट्र म्हणून दृढनिर्धाराने आपण उभे ठाकलो म्हणून हा टप्पा गाठू शकलो हे निर्विवाद. स्वातंत्र्योत्तर काळात काही कमावण्यापेक्षा आपण गमावले मात्र पुष्कळ असे मूल्यमापन करणारी मंडळी आपल्यात आहे. पण जीवनाचा अर्धा प्याला रिकामा आहे असे म्हणण्यापेक्षा तो अर्धा भरलेला आहे ही भूमिका केव्हाही श्रेयस्कर.

आपल्या राष्ट्रात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सुरू केलेला संग्राम हा केवळ राजकीय स्वरूपाचा संघर्ष नव्हता. राष्ट्रीय पुनरुत्थानाचे ते ऊर्जस्वल पर्व होते. त्यामागे नवविचारांचे अधिष्ठान होते, स्वातंत्र्यानंतरचा ५० वर्षांचा कालखंड हे राष्ट्रीय नवनिर्माणाचे पर्व होते. स्वातंत्र्याच्या जन्मकाली आपण जी भव्य-दिव्य स्वप्ने उराशी बाळगली ती सारीच फलद्रूप झाली नाहीत ही वस्तुस्थिती आपण मान्य करायला हवी. त्यासाठी अंतर्मुख होऊन सिंहावलोकन करण्यासाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा माानावा लागेल.

स्वातंत्र्यानंतरच्या या आधुनिक पर्वाचा आपण तटस्थपणे मागोवा घ्यायला हवा. शतकानुशतके चिरस्थायी आत्मिक मूल्यांच्या प्रकाशात पुरुषार्थी राष्ट्र म्हणून आपण वावरलो. आपल्यावर अनेक संकटे आली. अनंत आव्हाने आपल्यासमोर उभी राहिली. आजही विघटनात्मक शक्ती वारंवार डोके वर काढताना दिसतात. तरीही येथील एकसंधत्वाला, एकराष्ट्रीयत्वाला तडे जाऊ शकलेले नाहीत. कारण आपल्या पूर्वसंचिताचा मूलस्रोत प्रभावी असल्यामुळे क्षणिक किल्मिषे कुठच्या कुठे नष्ट झाली. नव्या उभारीने आपण उभे राहिलो. आजवर असे अनेकदा घडले. म्हणून आपल्या आत्मश्रद्धेला तडे जाता कामा नयेत. शरीराच्या कोणत्याही अवयवाला इजा झाली असता वेदना सर्वांगाला होते. मन बेचैन होते. त्याचप्रमाणे आपल्या राष्ट्रावर कुठल्याही प्रकारची अस्मानी-सुलतानी आपत्ती कोसळली असता आपण मानसिक उद्ध्वस्तता अनुभवतो. ही संवेदनशीलता आपणास कठीण प्रसंगीही नवी प्रेरणा देईल. लोकशाहीत सामूहिक शक्ती जशी महत्त्वाची तशी व्यक्तीही महत्त्वाची. सामान्य असूनही आपणही राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेला हातभार लावणारे घटक आहोत हे आत्मभान आपणास उज्ज्वल भविष्यकाळाकडे वाटचाल करायला प्रेरणा देईल. 'राष्ट्र' ही संकल्पनाच मुळी माणसा-माणसांच्या एकात्म आशा-आकांक्षांमधून, समान स्पंदनलयीतून

तशीच शुभंकर, सृजनात्मक हातांनी नवा माणूस घडविण्याच्या प्रक्रियेतून साकार होत असते. व्यक्तीच्या अंतरंगातील श्रद्धेची फुले राष्ट्रहिताच्या मालेत तन्मयतेने गुंफली जातात तेव्हा त्यांना जोडणारा धागा सुगंधित होतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या चैतन्यपर्वात अशी मने घडविण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे.

स्वातंत्र्य हे जीवनातील श्रेष्ठतम मूल्य असते. साहित्यातील आत्माविष्कारामागे हीच प्रेरणा महत्त्वाची. आत्मिक उन्नयनाची दिशा वाङ्मयीन अभिव्यक्तीद्वारा लाभत असते. जीवनप्रमेयांचे प्रगल्भ आकलन आणि जाणीवपूर्वकतेने त्यांची केलेली कलात्म मांडणी हा निर्मितीशीच साहित्याचा केंद्रबिंदू असतो. मराठीमन हे पर्यायाने भारतीय मन आहे. गेल्या ५० वर्षांतील मराठी साहित्याचे संक्षेपाने पर्यालोचन केल्यास मरावी मनातील स्पंदनलयींचा तटस्थपणे मागोवा घेता येईल. येथील जनमानसातील विचारांची, भावनांची आंदोलने त्यात पाहता येतील. सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितिगतीचा आलेख पाहता येईल. शेवटी साहित्यनिर्मिती हाही सामाजिक दस्तऐवज असतो. समाजाचे संचित या आत्मविष्कारातून प्रकट होत असते.

या पांच दशकांत आपल्या देशात शिक्षणाची पुनर्रचना झाली. शिक्षणाचा प्रसार तळागाळापर्यंत झाला. एकसंध समाजाची अभिव्यक्ती भाषेच्या माध्यमातून होत असते. हे जाणून राष्ट्रनेत्यांनी राज्यांची पुनर्रचना केली. विविध संस्कृतिवैशिष्ट्यांनी नटलेला एकात्म भारत निर्माण व्हावा अशी त्यामागची संकल्पना होती. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य निर्मिती झाली. साहित्य, कला, संस्कृती या क्षेत्रांत वावरणाऱ्या प्रतिभावंतांना शासनाकडून प्रोत्साहन मिळाले. स्वातंत्र्यपूर्व काळात साहित्यनिर्मिती करणारा वर्ग मर्यादित होता. स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक अभिसरण प्रक्रिया सुरू झाली. समाजाच्या अनेक स्तरांवरच्या लोकांना शिक्षणाचा लाभ घडला. विविध ज्ञानक्षेत्रे त्यांना उपलब्ध झाली. वाङ्मयाच्या आस्वाद प्रक्रियेच्या आणि अभिरुचीला पोषक वातावरण त्यामुळे निर्माण झाले. साहित्यनिर्मितीची उर्मी आजवर उपेक्षित असलेल्या समाजघटकांमध्ये निर्माण झाली. या दृष्टीने स्वातंत्र्योत्तर कालखंड हा साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने नवा मनू मानता येईल.

स्वतंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता, नाटक या प्रमुख वाङ्मय प्रकारांत सकस निर्मिती झाल्याचे आढळून येते. या साहित्यात विविध वृत्ती-प्रवृत्ती आणि अंत:प्रवाह आढळतात. ललित निबंधाचे क्षेत्र अनेक वाटांनी पल्लवित झालेले दिसते. विद्यापीठीय शिक्षणाच्या प्रसाराबरोबर समीक्षा, संशोधन या क्षेत्रांत लक्षणीय वाङ्मय निर्माण झाले. सृजनशील साहित्याबरोबर याही वाङ्मयाची समाजाच्या अभिवृद्धीसाठी आवश्यकता होती. चरित्र-आत्मचरित्रांद्वारे गतकाळाचे सिंहावलोकन मोठ्या प्रमाणावर झाले. आतापर्यंत मानवी हक्कांपासून वंचित झालेली. स्वतंत्र्योत्तर काळात फार मोठ्या प्रमाणात शिक्षण घेऊ लागली. आगरकर, महात्मा फुले आमि महर्षी कर्वे यांच्या दृढ प्रयत्नांचे फलित स्वातंत्र्योत्तर काळात दिसू लागले. स्वविषयक जाणीव विकसित झालेली स्री आपल्या मनातील स्पंदनांना मोकळेपणाने वाट करून देऊ लागली. स्वातंत्र्यपूर्व काळात मुके राहिलेले क्षितीज स्वातंत्र्योत्तर काळात मुखर झाले. ही अत्यंत स्वागतार्ह घटना ठरली. स्रीविश्वातील अनेक अज्ञात कंगोरे या काळात साहित्याच्या माध्यमातून उलगडले गेले. मराठी साहित्याला जीवनदर्शनाची नवी मीती त्यामुळे प्राप्त झाली.

दलित साहित्याच्या निर्मितीमुळे अनुभूतीचे नवे पर्व उजाडले. निकष ठरवून साहित्यनिर्मिती होत नाही. आंतरिक व्यथावेदनांची उर्मी अपरिहार्यपणे लेखनमाध्यमातून अभिव्यक्त होते. तीनुसार निकष ठरतात अशी दलित साहित्याची धारणा आहे. सुरुवातीच्या काळात कविता, आत्मचरित्र आणि

*With Best Compliments From:*

**RELIANCE CONSTRUCTION CO.**

**105-C, SHYAM KAMAL,
AGARWAL MARKET,
VILE PARLE (E),
MUMBAI-400 057.**

कथा हे वाङ्मयप्रकार त्यांनी प्रामुख्याने हाताळले. दलित साहित्यिकांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांतून आणि आत्मकथनातून वास्तव जीवनातील प्रखर दर्शन घडते. परंपरेला छेद देणे, प्रस्थापित मूल्यांवर आघात करणे आणि विद्रोह व्यक्त करणे या उर्मी त्या लेखनामागे आहेतच. पण या मूर्तिभंजनातून उद्याच्या उज्ज्वलाचा व नवसर्जनाचा आश्वासक स्वरही प्रकट झालेला आहे. आम्ही यापुढे गतानुगतिक राहू इच्छित नाही, मागची कित्येक शतके अंधःकारात काढली, आता ज्ञानाचा प्रगतीचा नवा आदित्य आम्हाला पाहू द्या अशी आर्त किंकाळी त्यात आहे. भोगलेल्या दुःखव्यथातून आलेला हा अंतःसूर आहे. स्वातंत्र्योत्तर समता प्रस्थापित करण्याच्या संगरातील हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळवून देणे या नव्या जाणिवेचा मूल्यभाव या प्रेरणेत आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात जी सामाजिक स्थित्यंतरे झाली त्याचे परिणामस्वरुप म्हणून स्त्रीवर्ग जागृत झाला, दलितवर्ग जागृत झाला. आणि त्यांच्या विचारांना, भावनांना सृजनशील साहित्यातून आविष्कार मनमोकळेपणाने त्यांना करता आला. सामाजिक बदलाबरोबर आर्थिक क्षेत्रात बदल झाले. औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. ग्रामरचना बदलली. खेडी दिवसेंदिवस ओस पडून शहराकडे धावण्याचा हव्यास सुरू झाला. वाढत्या ज्ञान, विज्ञान आणि तंत्रविज्ञानामुळे कृषिसंस्कृतीत आमूलाग्र बदल झाले. त्यामुळे माणसांच्या मनोरचनेत बदल झाला. ग्रामीण आणि प्रादेशिक चित्रण करणाऱ्या कथाकारांनी आणि कादंबरीकारांनी हे बदलते वास्तव रेखाटण्याचा प्रयत्न केला. लोकशाही विचारप्रणाली आपण स्वीकारली खरी पण पक्षीय राजकारणाला आणि सत्ताकेंद्राला अवास्तव महत्त्व प्राप्त झाले. सार्वजनिक जीवन राजकारणग्रस्त झाले. शिक्षणप्रसार वाढला खरा पण त्यातही अनाचार शिरला. या क्षेत्रांतील प्रदूषणांवर मराठी साहित्यिकांनी भेदकपणे 'क्ष' किरण टाकलेले आहेत. या समकालीन समाजवास्तवाचा वेध घेणाऱ्या समर्थ साहित्यकृती स्वातंत्र्योत्तर कालखंडात निर्माण झाल्या. त्यांचा साक्षेपाने विचार व्हायला हवा. विज्ञानाच्या वाढत्या प्रगतीबरोबर मराठी साहित्याचे दालन विज्ञान कादंबरीने आणि विज्ञानकथेने समृद्ध झालेले आहे. पाश्चात्त्या जगाच्या तुलनेने भारताने या क्षेत्रात उशिरा प्रवेश केलेला असला तरी स्वातंत्र्योत्तर कालखंडात अभिमान वाटावा अशी वैज्ञानिक प्रगती त्याने केलेली आहे. विज्ञानयुगात आत्मविश्वासाने वावरणे हे स्वाश्रयी समाजाचे एक महत्त्वाचे लक्षण असते. आज आपला समाजाच्या एक प्रगत अंगाचे दर्शन या विज्ञानसाहित्यातून घडत आहे.

मराठी साहित्यविश्वातील वृत्ती-प्रवृत्तीचा विचार करताना असे जाणवते की भूतकाळाकडे दृष्टी वळवून लेखन करणारा लेखकवर्ग आपल्याकडे आहे. इतिहासकालीन अथवा पुराणकालीन व्यक्तित्त्वाचा तो शोध घेतो, पुनर्मांडणी करतो. कधी कधी समकालीन वास्तवाची सांधेजोड करून तो त्यातून नवनिर्मिती साधतो. पूर्वसूरींची समृद्धी आणि वैभवसंपन्न इतिहास त्याच्या प्रतिभेला साधनसामग्री पुरवीत असतो. या कलाप्रक्रियेत लेखकाचा कस लागत असतो. प्रतिभासंपन्न लेखकाने स्थल-काल-निरपेक्ष-सत्य सांगण्यासाठी इतिहास-पुराणाचा, रामायण-महाभारताचा आधार घेतला तर ते दोषर्ह ठरू शकत नाही. तो वास्तवापासून दूर गेला असे म्हणता येणार नाही. तो जीवनातील शाश्वत सत्याला कितपत भिडला यावर त्याच्या साहित्यकृतीची महत्ता अवलंबून राहील.

वास्तवाभिमुख राहून समकालीन जीवनावर भाष्य करणाऱ्या वास्तववादी लेखनाची प्रेरणा ही आज प्रामुख्याने मराठी साहित्यात आढळते. समाजमनाला ग्रासणाऱ्या वैफल्यग्रस्ततेचा, भ्रमनिरासाचा, ताणतणावांचा आणि किंकर्तव्यमूढतेचा अचूक वेध १९६० नंतरच्या कथा, कादंबरी, कविता आणि नाटक या प्रकारांत अनेक साहित्यिकांनी घेतलेला आहे. त्यातील वृत्तिगांभीर्य कलामूल्यांची जाणीव आणि जीवनप्रमेयांना भिडण्याची क्षमता प्रशंसनीय आहे. पण वास्तवदर्शनखेरीज साहित्यात अन्य प्रेरणाच असू शकत नाही असा त्यांचा दृष्टिकोन एकांगी वाटतो. प्रज्ञा आणि प्रतिभा लाभलेला साहित्यीक जीवनदर्शन. अनेक पातळ्यांवरून घडवत असतो. त्याने ते घडवावे अशी अपेक्षा असते. शाश्वत सौंदर्याचा शोध हीही सृजनशील लेखकाच्या लेखना मागची मूळ प्रेरणा असते हे विसरून कसे चालेल?

समाजातील वाङ्मयीन अभिरुचीची अभिवृद्धी व्हायची असेल तर स्वागतशील वृत्तीने सर्व विचार प्रवाहांकडे पाहण्याची सर्वसमावेशक दृष्टी विकसित होणे जरुरीचे आहे. साहित्यिक हा जीवनाचा शोध घेत असतो. म्हणून जीवनाच्या समग्रतेचे भान त्याला असायला हवे. आपल्याच विचारसरणीचा आग्रह धरून तुच्छतावादी भूमिकेतून इतरांच्या साहित्याकडे पाहणे योग्य नव्हे. एकविसाव्या शतकाची नवी आव्हाने स्वीकारीत असताना सृजनशील साहित्याविषयी ओढ कायम राखण्यासाठी वाङ्मयोपासकांनी अशी निकोप वाङ्मयीन संकृती निर्माण करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी संवत्सरात या दृष्टीने विचार होणे अगत्याचे वाटते.